






डोअर स्टेप स्कूल
११०, आनंद पार्क,
औंध, पुणे ४११००७
☎ २५८९८७६२/२५४३२१६५
ई-मेल : dsspune@vsnl.net

Sankalpaa Graphics Ph.: 24357117

# गोष्टी इकडच्या तिकडच्या गमती जमतीच्या (भाग-४)

## उंटाला मिळाला कोकाकोला



प्रकाशकः

डोअर स्टेप स्कूल
११०, आनंद पार्क,
औंध, पुणे ४११००७
☎ २५८९८७६२
२५४३२१६५
ई-मेल : dsspune@vsnl.net

डोअर स्टेप स्कूल
५२/५३ जे.एस. म्युनसिपल स्कूल
नाना चौक, ग्रॅन्ट रोड
मुंबई ४००००७
☎ २३८२६३४३/२३८५९२०३

© डोअर स्टेप स्कूल

किंमत रु

तिसरी आवृत्ती :
मार्च २००४
कव्हर :
बी. सुहासिनी
आतील चित्रे :
कॉम्प्युटर ग्रॅफिकस आणि
संपदा भानप, शमा जोशी व
बी. सुहासिनी

# उंटाला मिळाला कोकाकोला!

(जोडाक्षर विरहित)

एकदा एक उंट आईबरोबर बाजारात गेला. कसा होता तो उंट? वयाने लहान पण आकाराने मोठा. लांब लांब पायांचा, उंच उंच मानेचा आणि कमानदार पाठीचा. लहान होता पण शहाणा होता. आईचं ऐकायचा. तर असा हा उंट. एकदा कुठे गेला? बाजारात गेला. कोणाबरोबर गेला? आईबरोबर गेला. मग काय झालं? वाचून तर पाहा.

आई आणि उंट दुकानात निघाले. आई पुढे आणि उंट मागे. लांब लांब

टांगा टाकत निघाले, हळू हळू पोहोचले दुकानाशी. आई आत गेली उंट थांबला बाहेर. आईने तिला हवे असलेले काय काय घेतले. डाळ घेतली, तांदूळ घेतले, चहा घेतला, साखर घेतली, तेल घेतले, तूप घेतले, कांदे घेतले, बटाटे घेतले, काही ना काही घेतच राहिली. तिचं घेणं काही संपेचना इकडे दुकानाबाहेर उभं राहून राहून उंट कंटाळला. मान उंच करून करून दुकानात काय आहे ते पाहू लागला.

दुकानात उंटाला दिसली गंमतच गंमत. राजगिरा लाडू दिसला, शेंगदाणा चिकी दिसली, बरणीत ठेवलेली रंगीत,



रंगीत, आंबटगोड लिमलेटची गोळीही दिसली. अगदी तोंडाला पाणी सुटलं. मान दुसरीकडे वळवली तर चिकलेटची पाकीटं दिसली हातावर चिकटवतात ते छाप असलेली. बाटलीत दिसला कोकाकोला. आणखीनही काही काही दिसले. छान छान रंगांचे कितीतरी पुडे. उंटाला तर काही कळेचना. कशात काय आहे आणि कशात काय.


मग उंटाने हळूच आईचा पदर ओढला. आईने मागे वळून पाहीले आणि विचारले "काय हंवय रे तुला?" काहीही चालेल. मला गोळी फार आवडते. चिकीची वडीही आवडते

राजगिरा लाडू तर खूपच आवडतात. काय घेशील तू मला? नाहीतर सगळंच घे थोडं थोडं. घरी जाताना खाईन मी हळू हळू." आई हंसली 'तुला तर सगळंच हंवय. पण हे बघ आज एकदम सगळंच घेणार नाही. शिवाय एकदम सगळं खायचं देखील नाही. थोडं थोडं, पुरवून, पुरवून खायचं. आहे कबूल?" उंटाने जोरजोरात मान हालवली. सगळं कबूल केलं. "मी अगदी शहाणा होईन. मुळीच रडणार नाही. थोडंथोडं, तू देशील तेवढंच खाईन." अशी आईला कबुलीही दिली.

आईने मग उंटासाठी थोडा थोडा खाऊ घेतला. दुकानदाराला पैसे दिले. आणि आता घरी जाणार तोच उंटानं आईचा परत पदर ओढला. "आई मला तहान लागलीय. खूप तहान लागलीय. आई आता काय करू? आई विचारात पडली. आई काहीच बोलत नाही असे पाहून उंटाने विचारले "आई कोकाकोला घेतेस? एकदाच. परत नाही मागणार. खरंच. आई घे ना. आईनं उंटाची लबाडी ओळखली. आणि तिला हसूच आले. "तहान लागली काय? लबाड कुठला. बरं चल. आजच घेईन हं कोकाकोला. नेहेमी नेहेमी नाही.." आईनं कोकाकोला घेऊन उंटाला दिला. दुकानदाराने एक लांब नळी

उंटाला दिली. आणि बाटली कपाटावर ठेवली उंटाने नळी तोंडात धरली नळीची दुसरी बाजू बाटलीत घातली. आणि हळू हळू करत सगळी बाटली संपवली. आणि मग निघाला घरी लांब लांब टांगा टाकीत आईबरोबर....

❑❑





# *माझी आई*

(जोडाक्षर विरहित)

माझी आई भाजी विकते. तिची भाजीची गाडी आहे. चार चाकांची. गाडीवर भाजी घालायची आणि ढकलत ढकलत घेऊन जायची. आई रोज सकाळी लवकर उठते. कधी ते मला कळतच नाही. मी तर झोपलेलाच असतो. सकाळी उठून आई मंडईत जाते. मंडईतून भाजी आणते. थोडी फळभाजी थोडी पालेभाजी. मिरची, लिंबू, आले, कोथींबीर, कढीलिंब, पुदीना, असा मसालाही आणते. शिवाय येताना मला काहीतरी खाऊही आणते. पेरू तर

नेहमीच आणते. कधी चिंचा, कधी बोरे. असा खाऊ असला तर मी शाळेतही नेतो. मुलांबरोबर वाटून खातो. मग माझा भाव खूपच वाढतो.

घरी येऊन आई भाजी वेगवेगळी करते. फारच माती असेल तर धुवून साफ करते. सडलेली, नासलेली भाजी काढून टाकते. भाजी चांगली निवडून वेगवेगळी केली नाही तर भाजी लवकर खराब होते. शिवाय लोकांनाही ती आवडत नाही. लोकांना आवडली नाही तर लोक भाजी घेत नाहीत. मग आमचे नुकसान होते. पण आई नुकसान होऊ देत नाही. तिची भाजी नेहमी ताजी



असते. भाजी उरली तर ती भाजी आई माठात ठेवते. कारण माठ गार राहतो. तापत नाही. गार जागी भाजी ताजी रहाते. सुकत नाही.

आई भावही चांगला देते. इतरांपेक्षा थोडा कमीच. शिवाय बोलतेही गोड. मग तिची भाजी लवकर खपते. लोक तिची वाट बघतात. तिची घरे ठरलेली आहेत. तिथे तिथे जाऊन भाजी विकून आई दुपारी घरी येते. सकाळी रांधून ठेवलेली भाजी भाकरी, चपाती भाजी किंवा डाळभात जे असेल ते खाते आणि थोडीशी आडवी होते.

मी तोवर शाळेतून घरी आलेला असतो. आई दमून झोपली असली तर हळूच आवाज न करता आपला आपला खेळत बसतो. आईला उठवत नाही. कधी कधी बाहेर जाऊन मी तिची गाडी ढकलून बघतो. गाडी रिकामी असली तरी मला जडच लागते. सहज ढकलता येत नाही.

पाऊस असो की थंडी, ऊन असो की वारा, आईला काही घरी बसता येत नाही. किंवा 'आज नाही जात मी भाजीला' असेही करता येत नाही. आपण कशी कधी कधी शाळा बुडवतो तसा कंटाळा करून आईला चालत



नाही. "तू शिकून मोठा हो मग बसेन मी घरी" असे ती कधीकधी मला सांगते.

मग मला आपण एकदम मोठे झालो तर काय मजा येईल असे वाटते. कधीकधी झोपताना मी देवाला सांगतोदेखील "देवा मला लवकर मोठे कर. मग मी आईला आराम देईन. सुखात ठेवीन. मी काम करीन आणि पैसे मिळवीन. मी मोठा झालो की आईला अशी वणवण करावी लागणार नाही." असा विचार करता करताच मला झोप लागते. सकाळी जाग आली की शेजारी आई नसते. मग एकदम लक्षात येते की झोपून चालणार नाही. शाळेत

गेले पाहीजे. खूप खूप शिकले पाहीजे. तरच आईला सुखात ठेवता येईल. नुसतच वयाने माठे होऊन चालणार नाही शिकूनही मोठे झाले पाहीजे.

मग मी पटकन उडी मारून उठतो. तयारीला लागतो. भरभर आवरून शाळेला जातो....

□□□



चित्रः प्रीति निम्हण

लेखकः रजनीपरांजपे



## आमची पुस्तके

अ-गट
- पुस्तकमाला भाग-१ (मुळाक्षरे)
- पुस्तकमाला भाग-२ (आकार)
- पुस्तकमाला भाग-३ (ईकार)
- पुस्तकमाला भाग-४ (उकार)
- पुस्तकमाला भाग-५ (एकार)
- पुस्तकमाला भाग-६ (ऐकार)
- पुस्तकमाला भाग-७ (ओकार)
- पुस्तकमाला भाग-८ (औकार)

ब-गट
- मुळाक्षरांचे पुस्तक
- कान्याचे पुस्तक
- वेलांटीचे पुस्तक
- उकारांचे पुस्तक
- एका मात्रेचे पुस्तक
- दोन मात्रांचे पुस्तक
- ओकाराचे पुस्तक
- औकाराचे पुस्तक

- जोडाक्षरांचा सराव - २ भाग
- कोडीच कोडी मजाच मजा - २ भाग
- लहान शब्दकोश
- गोष्टी इकडच्या तिकडच्या गमती जमतीच्या
- हस्तपुस्तिका
- बहिस्थ परिक्षेसंबंधीची माहिती
- वयाचा दाखला कसा काढावा ?
- शालेय वाचनालय चालवताना